## 'ती' कालची आजची अन् उद्याची'

मी फार मोठी लेखिका नाही , मी फार मोठी तत्वचिंतक नाही किंवा मी सामाजिक कार्यकर्ती पण नाही पण विद्यार्थी म्हणून शिकत असताना ज्ञान ग्रहण करत असताना काही गोष्टी माझ्या निदर्शनास आल्या त्या मी या लेखा द्वारे मांडणार आहे.
"मग नेमके काय चुकले"? हा प्रश्न माझ्या मनात आला.
तो झाशीच्या राणीचा इतिहास वाचताना मग नेमके काय चुकले ? हा प्रश्न माझ्या मनात आला. त्या जिजाबाईंनी छत्रपती शिवरायांना घडवताना , स्वराज्याचा बाळकडू आणि स्वाभिमानाचा धडा दिला हे वाचताना. मग नेमके काय चुकले ? हा प्रश्न माझ्या मनात आला. त्या स्वतंत्र भारताच्या पहिल्या पंतप्रधान यांनी देशवासीयांसाठी आणि त्यांच्या रक्षणासाठी निधड्या छातीने गोळ्या झेलल्या त्याचा अभ्यास करताना मग नेमके काय चुकले ? हा प्रश्न माझ्या मनात आला. त्या स्वतंत्र भारताच्या प्रथम राष्ट्रपती होण्याचा मान मिळाला तो प्रतिभाताई पाटील यांचा अभ्यास करताना . मग नेमके काय चुकले कुठे माशी शिंकली! कल्पना चावला अंतराळ यानमध्ये भ्रमण करू शकते याचा अभ्यास करताना. मग नेमके काय चुकले असा प्रश्न अशा अनेक स्त्रियांच्या बाबतीत माझ्या मनात आला. खरंच मी मुलगी झाले आणि माझ्या घरातली पहिली बेटी झाले यात माझा दोष आहे का? अर्थात हा प्रश्न सर्वच मुलींच्या, महिलांच्या वतीने विचारते. हा माझा वैयक्तिक अनुभव नाही. माझ्या आई वडिलांनी मला कधीच माझ्या भावापेक्षा कमी लेखले नाही उलट त्यांना माझा अभिमानच आहे. पण हे १% अभिमान वाटणाऱ्या पालकांबद्दल मी बोलत नाहीतच , मी बोलतेय ते ९९% पालकांबदल ; कदाचित हा आकडा खोटा असू शकेल कारण मी सुरुवातीला म्हटले मी कोणी तत्वचिंतिका नाही , मी संशोधकीय ही नाही.

पण बहुसंख्य पालकांना मुलगी झाल्यावर त्यांच्या कपाळावर आठ्या येतात. आपण असं म्हणतो "पहिली बेटी धनाची पेटी " परंतु खरंच मुलगी झाल्यावर ती धनाची पेटी समजली जाते का ? नाही.
हे फक्त भिंतीवर लिहिण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये छापण्यासाठीच नाही का?

" यत्र नार्यस्तु पुजयन्ते, रमन्ते तत्र देवताः"
असे मानणारी आपली भारतीय परंपरा अहिल्या , द्रौपदी , सीता , तारा , मंदोदरी , या तेजस्वी पंचकन्यांचे नित्य आदराने स्मरण करा असे सांगणारी आपली भारतीय संस्कृती वास्तवाचा विचार केला तर आपल्या पुरुषप्रधान भारतीय संस्कृतीने स्त्रियांवर युगानुयुगे खरोखरच अक्षम्य असा अन्याय केला आहे. हे कडू जरी जहरी असले तरी ते सत्य मान्य करावेच लागेल.

कवी केशवसुतांनी 'तुतारी' या कवितेत असे म्हणतात,
'जुने जाऊ द्या मरणालागुनी जाळूनी किंवा पुरुनी टाका'
जसे की स्त्री उंबरठा ओलांडून बाहेर पडू शकत नव्हती. तिला शिक्षण घ्यायला मान्यता नव्हती पण ती आता पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून धैर्याने उभी आहे . एकविसाव्या शतकात स्त्रीने आपले दैदिप्यमान कर्तव्य सिद्ध करून दाखवले आहे.
मग नेमके काय चुकते ? ती कशात कमी पडते ? हे प्रश्न उद्भवतातच .
लहानपणापासून तिच्या वाट्याला आलेली कामे ती निमूटपणे करत असते एक अवाक्षर देखील न काढता .
मग इथे चुकते? शिक्षण घेऊन सर्वांच्या इच्छा पूर्ण करण्याचा प्रण ती घेते परंतु ते शिक्षण तिला घेता येत नाही .
मग इथे ती चुकते ?

विवाह करण्यासाठी लागलेले पैसे , ( हुंडा ) तो देता आला नाही तर ती चुकते ?
की सासरच्या मंडळींना आनंदी ठेवता आले नाही त्यांची इच्छा पूर्ण करू शकली नाही म्हणून ती चुकते ?
तिच्या इच्छा - आकांशा व्यक्त करीत नाही पूर्ण करत नाही , सतत 'आलीया भोगासी असावे सादर' ही कृती करते
म्हणून ती चुकत असते?
अर्थोपार्जन करण्यासाठी काही माता काळजावर दगड ठेऊन आपल्या घरादरासाठी बाहेर पडतात . कामाला जातात . आपापल्या परीने सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करतात .
म्हणून ती चुकते ? ती खरंच तिथे सुरक्षित असते ?
हा प्रश्न नेहमी अंतरंगात जाऊन उत्तराच्या शोधात असतो.
अहो हे स्त्रीचे संपूर्ण आयुष्यच या ना त्या कारणाने चुकत जाते .
आणि यातूनच ती खचते , हताश होऊन सकारात्मक आत्मशक्ती गमावून बसते.
आताचे जग हे आकाशात , समुद्रात झेपावू पाहतंय. चंद्र - सूर्य - ताऱ्यांना कवेत घेऊ पाहतय . परंतु या विश्वात सर्व महिलांना योग्य सन्मान दिला जातो का ? आणि जरी दिला तरी तो सत्यात उतरतो का ? असे एक ना अनेक प्रश्न , अनेक समस्या आ वासून उभ्या राहिलेल्या आहेत.
स्त्रीभ्रूण हत्या , लैंगिक अत्याचार , अंधश्रध्दा , जुन्या चालीरीती इत्यादी समस्या पदोपदी महिलांना भेडसावतात .
त्या समस्या दूर केल्या त्यावर योग्य तो मार्ग काढला तर नक्कीच स्त्रियांचे कार्यक्षेत्र विस्तारेल.
यासाठीच त्यांना कुटुंबाची , पतीची , चांगल्या व्यक्तींची , हितचिंतकाची साथ असणे अत्यंत गरजेचे आहे . तरच
स्त्रित्वाचा , स्त्री सुरक्षिततेचा पाया भक्कम होईल .
सर्वांची तिला प्रेमळ अशी चांगली साथ लाभली तर नक्कीच 'जागतिक महिला दिनाचे' सार्थक होईल .
आणि नेमके काय चुकते आहे याचे देखील उत्तर चुटकीसरशी मिळेल.
यातूनच हे सिद्ध होण्यास मदत होईल की;

"तुझ्या प्रयत्नांना मिळू दे, यशाची सोनेरी किनार,
लक्ष दिव्यांनी उजळू दे, तुझा संसार: कर्तत्व आणि
सामर्थ्याची ओढून ये नवी झालर,
स्त्री शक्तीचा होऊ दे पुन्हा एकदा जागर !!"

कुमारी माधवी विजयकुमार पवार . ✍️
इयत्ता : TYBA